देशोन्नती

# हिंगोली पोलिसांचे संकेतस्थळ अद्यावत

देशोन्नती वृत्तसंकलन...

हिंगोली : जिल्हा पोलीस अधीक्षक हिंगोली श्रीकृष्ण कोकाटे यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयात मुख्यमंत्री यांचे १०० दिवसांचे कृती आराखडा कार्यक्रमाअंतर्गत हिंगोली जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळ (www. hingolipolice. gov.in) अद्ययावत करून नागरीकांना सहजासहजी घरबसल्या पोलीस मदत मिळण्याकरीता सुविधा संकेतस्थळाचे माध्यमातुन उपलब्ध करून दिली आहे.

हिंगोली पोलिस दलाने त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (Website) नव्याने सुधारणा केल्या आहेत. या अद्ययावत संकेतस्थळामध्ये नागरिकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेषतः नागरिकांना घरबसल्या काही महत्त्वाच्या सेवांचा लाभ घेता यावा या उद्देशाने 'Lost and Found' (सापडलेल्या व हरवलेल्या वस्तू), 'Tenant Report' (भाडेकरू माहिती), CitizenAlertWall' (नागरिक सतर्कता संदेश) तसेच महत्त्वाचे क्रमांक, संकेतस्थळ, हरवलेली व्यक्ती, अनोळखी/ सापडलेला मृतदेह, एफआयआर, चोरीची व सापडलेली वाहने, महिला सुरक्षा आणि ज्येष्ठ नागरिक यांसारख्या अद्ययावत टॅब्स नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. Lost and Found या सुविधेमुळे नागरिकांना हरवलेल्या वस्तूंची माहिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविता येणार असून, सापडलेल्या वस्तूंची माहिती देखील सहजरीत्या तपासता येणार आहे. यामुळे नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचणार असून, त्यांची हरवलेली महत्त्वाची कागदपत्रे, वस्तू किंवा साहित्य सहजपणे शोधणे शक्य होणार आहे. Tenant Suvidha या सुविधेमुळे नागरिकांना घरभाडेकरूंची माहिती ऑनलाइन स्वरूपात नोंदविता येणार आहे. यामुळे पोलिसांना परिसरातील भाडेकरूंची माहिती त्वरित उपलब्ध होणार असून, सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा होण्यास मदत होणार आहे. Citizen Alert Wall या सुविधेमुळे नागरिकांना महत्त्वाच्या सूचना, सतर्कतेचे संदेश आणि सुरक्षाविषयक माहिती त्वरित मिळू शकेल. यामुळे नागरिकांना ताज्या घडामोडींची माहिती घरबसल्या मिळू शकते.

हिंगोली पोलिस दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी सदैव तत्पर असून, या नव्या सुविधा नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिंगोली पोलिस दलाने केले आहे.

## नागरीकांना घरबसल्या तक्रार नोंदविण्याची सुविधा



दिवसेंदिवस पोलिस दल हायटेक होत चालले आहे. हिंगोली जिल्हा पोलिस दलाने नागरीकांना घरबसल्या तक्रार नोंदविण्यासाठी या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

लोकमत

# पोलिसांच्या अनेक सुविधा मिळणार आता घरबसल्या

## हिंगोली पोलिसांचे संकेतस्थळ केले अद्ययावत

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली :** एखादी वस्तू किंवा महत्त्वाचा दस्तऐवज हरवला तर आता पोलिस ठाण्यात जाण्याची गरज नाही. पोलिसांच्या संकेतस्थळावरून घरबसल्या तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या पुढाकारातून या सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध झाल्या आहेत.

मुख्यमंत्री यांच्या शंभर दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमाअंतर्गत पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलिस दलाचे संकेतस्थळ अद्ययावत करण्यात आले आहे. त्यामुळे पोलिसांच्या मदतीसह अनेक सुविधा नागरिकांना घरबसल्या उपलब्ध होणार आहेत. www.hingolipolice.gov.in या संकेतस्थळात अनेक सुधारणा केल्या आहेत. त्यात लॉस्ट ॲण्ड फाउंड (सापडलेल्या हरवलेल्या वस्तू) : या सुविधेत नागरिकांना हरवलेल्या वस्तू आणि महत्त्वाच्या दस्तऐवजांची माहिती ऑनलाइन नोंदविता येईल. तसेच सापडलेल्या वस्तूंची माहिती तपासता येणार आहे. टेनंट सुविधा : या सुविधेत घरभाडेकरूंची माहिती ऑनलाइन नोंदविता येईल. त्यामुळे सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा होण्यास मदत होईल. सिटीझन अलर्ट वॉल : या सुविधेत नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना, सतर्कतेचे संदेश, सुरक्षाविषयक माहिती त्वरित मिळणार आहे. याशिवाय महिला सुरक्षा, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी अद्ययावत टॅब्स उपलब्ध केले आहेत.





नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांच्या सुविधा नागरिकांना तातडीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पोलिस दल सदैव तत्पर आहे. जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. त्यातूनच संकेतस्थळात सुधारणा केल्या. नव्या सुविधा नागरिकांसाठी सुरु केल्या आहेत. त्याचा लाभ घ्यावा.

**श्रीकृष्ण कोकाटे,** पोलिस अधीक्षक